पोलीस स्टेशन रामनगर जि. चंद्रपूर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** रामनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0833 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/07/2023 22:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 21/07/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/07/2023

**Time From (वेळेपासून):** 06:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 10:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/07/2023 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 054

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/07/2023 22:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

ईशान्य, 22 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** निंबाळा,चंद्रपुर

(c)**In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दिवाकर काशीनाथ सोनटक्के

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | निंबाळा,चंद्रपुर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | निंबाळा,चंद्रपुर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | स्वप्नील बबन निमगडे | | | 1. गुरुदास कांबळे याचे घरी किराय,महात्मा फुले चौक नगीनाबाग,चंद्रपुर,चंद्रपुर, रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 4 नोटा | 2,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | 2 सॅन्डीक्स कंपनिचे 32 GB चे मेमोरी कार्ड | 0.00 |
| 3 | इतर | घरगुती वस्तु | आरोपीचा हिरव्या रंगाचा जिन्स पॅन्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

दिनांक:- 21/07/2023

मी दिवाकर काशीनाथ सोनटक्के, वय 40 वर्षे, धंदा-शेतमजुरी, रा. निंबाळा, ता.जि. चंद्रपुर येथे राहतो. मला सन 2021-2022 मध्ये या आर्थिक वर्षाकरिता प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत घरकुल दिनांक 27/01/2023 रोजी मंजुर करण्यात आला. माहे फेब्रुवारी/2023 ला माझे घरकुल मंजुर झालेबाबत गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती चंद्रपुर यांनी मला पंचायत समिती चंद्रपुर येथे बोलावुन माझे आधार कार्ड, नमुना-8 व बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत येथे आणुन देण्याबाबत कळविले. त्यावरुन मी गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब यांनी सांगितलेले सर्व कागदपत्रे घेवुन पंचायत.समिती चंद्रपुर येथे जावुन गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब यांचेकडे दिले. त्यावरून मला दिनांक 09/03/2023 रोजी पहिला टप्पा 20,000/-रू. व दिनांक 12/05/2023 रोजी दुसरा टप्पा 45,000/-रू. माझे बँक खात्यात जमा झाले. आता माझा घरकुल योजनेचा तिसरा टप्पा 45,000/-रू मिळणार असुन गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब हे दिनांक 05/07/2023 रोजी मौजा निंबाळा येथे आले तेव्हा मी त्यांना माझा घरकुल योजनेचा तिसरा टप्पा कधी मिळणार याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला तिसऱ्या टप्प्याचे रक्कम पाहिजे असेल तर मला 5,000/-रू. द्यावे लागतील अन्यथा तुमचे काम होणार नाही असे म्हणाले. तसेच मला दिनांक 18/07/2023 रोजी फोन करून परत मला 5,000/-रू लाचेची मागणी केली. तु जर मला माझेकरीता 5000/-रु. दिले नाहीतर तुझे घरकुल योजनेचा तिसऱ्या टप्प्याची रक्कम तुझे खात्यात जमा करणार नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवून माझेकडे सध्या रुपये नाहीत मी शेतमजुरी करून दोन तिन दिवसात जमा करून देतो असे म्हणुन फोन ठेवुन दिला.
मला गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी दिनांक 20/07/2023 रोजी श्रीमती भोसले मॅडम, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर यांना मोबाईल वर संपर्क करुन वरील हकीकत सांगितली असता श्रीमती भोसले मॅडम यांनी मला गै.अ श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर हे कधी भेटणार आहेत असे विचारले. त्यावर मी भोसले मॅडम यांना श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर हे उद्या दिनांक 21/07/2023 रोजी सकाळी 9/00 वा. दरम्यान माझे राहते घरी मौजा निंबाळा येथे घरकुल बांधकामाचा फोटो काढणेकरिता येत आहे असे सांगितले. त्यावरुन श्रीमती भोसले मॅडम यांनी मला मौजा निंबाळा येथील शेतशिवार परिसरात उद्या दिनांक 21/07/2023 रोजी सकाळी 8/00 वा. दरम्यान थांबून रहा तिथे आमचे कार्यालयातील पोलीस निरीक्षक श्री गुरनुले साहेब हे पंच व कार्यालयीन स्टॉफसह हजर येवुन तुमची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करतील असे कळविल्याने मी आज दिनांक 21/07/2023 मौजा निंबाळा येथिल शेतशीवाराजवळ हजर असतांना लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय चंद्रपुर येथिल श्री गुरनुले साहेब हे दोन पंच व कार्यालयीन स्टॉफसह शासकिय वाहनाने सकाळी 8/00 वाजता दरम्यान हजर आले.

तरी माझा गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांचेंशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. मला लाच मागणाऱ्या गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांचेविरूध्द कार्यवाही होण्याकरीता लाचरक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम माझे वैयक्तिक बचतीतुन जमा केलेले 5,000 /-रू.आपणाकडे लाचरक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंर्तगत असलेल्या घरकुल योजनेचे तिसऱ्या टप्प्यांची रक्कम काढुन देण्याच्या कामाकरिता 5,000/-रू ची लाच मागणारे गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांचेविरुध्द कार्यवाही होणेस श्री. गुरनुले साहेब यांना मी लेखी तक्रार दिली.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र गुरनुले साहेब यांनी त्यांचे सोबत हजर असलेल्या दोन्ही पंचाची व स्टॉफची माझे सोबत ओळख करून दिली. श्री. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या लेखी तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व श्री. गुरनुले साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.
त्यानंतर श्री.गुरनुले साहेब यांना मी सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम 5,000/- (रू.500/- दराच्या 10 चलनी नोटा) दिलेल्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी दिलेल्या सूचनेवरुन ना.पो.कॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि पडताळणी कारवाइच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या).
त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांचे सुचनेवरुन ना.पो.कॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे कमरेवर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मी सोबत आणलेल्या हिरो होंडा एच.एफ.डिलक्स दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-ए.के 9024 नी पंच क्र. 01 यांचेसह मला माझे घराचे घरकुलाचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांचेकडे पडताळणी करीता पाठविले.
पडताळणी दरम्यान गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांनी मला ''तुम्हीच सांगा फक्त तुमच्या कामासाठी आलो, हो काहीच काम नव्हतं मी म्हणलं मी किती दिवस ठेवु बा, करा नं काहीतरी, जेवढे होते तेवढे द्या'' असे म्हणुन पंचासमक्ष मला उजव्या हाताचे दोन बोटे दाखवुन गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांनी 5,000/- रूपये ची लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2,000 रूपये/- लाचरक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने पडताळणी कार्यवाही करुन परत आलो व पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले.
तदनंतर पोनि. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष यांनी गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांचेविरूद्ध पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. पंचनामा क्र 1 प्रमाणे मला अँथ्रॅसिन पावडर लावलेली 5,000/-रूपयांपैकी मला तडजोडीअंती ''जेवढे होते तेवढे द्या'' असे म्हणुन पंचासमक्ष मला उजव्या हाताचे दोन बोटे दाखवुन मागणी केली असलेली लाचेची 2,000/-रू रक्कम माझे कथ्थ्या रंगाच्या लोअर पॅन्ट चे समोरील बाजुचे उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गै. अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळ्यातील पांढऱ्या रंगाचा दुपट्टा गळ्यातुन काढुन चेहरा पुसुन डाव्या हातात ठेवुन लाचरक्कम दिल्याबाबतचा ईशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.
त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन नापोकॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मी सोबत आणलेल्या हिरो होंडा एच.एफ.डिलक्स दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-ए.के 9024 नी पंच क्र. 01 यांचेसह मौजा निंबाळा येथिल माझे घरकुलाचे बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी जाण्यास रवाना केले

व सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 मौजा निंबाळा येथिल माझे घरकुलाचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी गेलो असता त्या ठिकाणी गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर हे मौजा निंबाळा येथिल माझे घरकुलाचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी हजर होते. त्यांचेशी बोलणी दरम्यान गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांनी मला हाताने ईशारा करून पैसे आणले का याबाबत विचारले असता मी त्यांना "आता कसा हे तुम्ही पाच म्हणले पाच हजार रूपये म्हणले होते पण दोन हजार रूपये आता जमवलो कसातरी" असे म्हणुन गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांना माझे जवळील लाच रक्कम 2,000/-रू. दिले असता गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांनी "ठिक आहे" असे म्हणुन माझेकडुन 2,000/- रूपये लाच रक्कम आपले उजव्या हाताने घेवुन आपले हिरव्या रंगाचे जिन्सपॅन्टचे उजव्या बाजुचे समोरील खिश्यात ठेवले.
त्यानंतर मी दर्शनी भागावर येवुन सापळा पथकास माझे गळयातील पांढऱ्या रंगाचा दुपट्टा गळयातुन काढुन चेहरा पुसुन डाव्या हातात ठेवुन गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गै.अ.श्री निमगडे, इंजिनिअर साहेब, पंचायत समिती, चंद्रपुर लाच घेतांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 02 मध्ये घेण्यात आल्या)
तरी स्वप्नील बबन निमगडे, धंदा-नौकरी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, कार्यालय ता. चंदपुर जि.चंद्रपुर (कंत्राटी) यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत असलेल्या घरकुल योजनेचे तिसऱ्या टप्प्यांची रक्कम काढुन देण्याच्या कामाकरिता 5,000/-रू ची लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2,000/-रूपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करून माझेकडुन लाचेची रक्कम 2,000/-रु. स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कार्यवाही होणेकरीता कायदेशीर फिर्याद देत आहे.
माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(जितेंद्र गुरनुले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Rajesh Bhagwan Muley(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

21-07-2023

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajesh Bhagwan Mu

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ड्युटी ऑफिसर
पो. स्टे. रामनगर
जिल्हा-चंद्रपूर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)